पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक २ ■ शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# महापालिका हद्दीत 'ओपन स्पेस' चा घोटाळा

## 50 ओपन स्पेस सापडेना, 130 ओपन स्पेसचे नकाशे गायब

प्रतिनिधी ५ जून

**अकोला:** शहरातील नागरिकांच्या हक्काच्या मोकळ्या जागांवर, म्हणजेच 'ओपन स्पेस' वर भूमाफिया आणि प्रशासकीय आशीर्वादाने दरोडा टाकल्याचा एक अत्यंत खळबळजनक प्रकार 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या हाती आलेल्या विशेष कागदपत्रांवरून उघडकीस आला आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील शेकडो लेआऊट मधील ५० पेक्षा जास्त मोकळ्या जागा अर्थात ओपन स्पेस प्रत्यक्ष जमिनीवरून गायब झाल्या आहेत, तर १३० पेक्षा जास्त जागांचे नकाशेच महापालिका आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणेच्या दप्तरी उपलब्ध नाहीत. नागरिकांच्या ऑक्सिजन झोनवर, लहान मुलांच्या खेळण्याच्या मैदानांवर आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्याच्या जागांवर डल्ला मारणारा हा अकोल्याच्या इतिहासातील सर्वात मोठा जमीन घोटाळा मानला जात आहे.



### अकोल्याच्या हक्काच्या जागांवर डल्ला कोणी मारला ?

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील ओपन स्पेस चा अधिकृत सरकारी माहितीचा कच्चा चिट्ठा जेव्हा 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने उपसला, तेव्हा थक्क करणारी आणि संतापजनक आकडेवारी समोर आली आहे. सरकारी कागदपत्रांमध्ये अकृषक आदेश झालेले आहेत, पण प्रत्यक्षात ओपन स्पेस च्या जागा कुठे आहेत, याचे उत्तर ना महापालिकेकडे आहे ना भूमि अभिलेख विभागात. शासकीय कागदावर 'ओपन स्पेस' असे लिहिल असले तरी प्रत्यक्षात मात्र ओपन स्पेस घटनास्थळावर सापडल्या नाहीत. महापालिका प्रशासनाने अधिकृतपणे ४६८ लेआऊट पैकी पन्नास 'ओपन स्पेस सापडली नाही' अशी नोंद खुद्द एका पाहणीत समोर आली आहे. या ओपन स्पेस भुमाफियांनी कोणाला विकल्या असा प्रश्न आता विचारला जात आहे.

### १३० ओपन स्पेसचे नकाशा गायब

अकोला महापालिकेच्या हद्दीतील ४६८ लेआऊट पैकी ५० ओपन स्पेस सापडल्या नाहीत. आणि १३० ओपन स्पेस चे नकाशे गायब आहे. म्हणजे काय तर या पण, ओपन स्पेस विकल्या गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळ्यात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. नकाशाच सापडत नसल्यामुळे भूमाफियांना मोकळया जागांवर बेकायदेशीर बांधकामे करणे किंवा प्लॉट पाडून विकणे सोपे झाले आहे. शिलोडा, हिंगणा-म्हैसपूर, डाबकी, उमरी, कौलखेड आणि खडकी बु. सारख्या मुख्य भागांतील शेकडो सर्व्हे क्रमांकांचे नकाशे गायब आहेत.

### शेतजमीन ते लेआऊट चा प्रवास

शेतजमीनीचे लेआऊट टाकताना उपविभागीय अधिकारी, भूमि अभिलेख आणि महापालिका या तीन विभागाचा संबंध येतो. शेतजमीनीचे बिगर शेत जमीन करणे (एन.ए.) करणे हे करताना भूमि अभिलेख रस्ते,नाल्या, ओपन स्पेस आखून देते. २००२ पुर्वी उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ) आणि तदनंतर महापालिका आयुक्त हे ओपन स्पेस निश्चिती करत होते. असे असताना ५० ओपन स्पेस गायब होणे आणि १३० चे नकाशे महापालिकेला प्राप्त न होणे या मोठ्या घोटाळयात कोण सहभागी आहे. एखाद्या लेआऊटच्या दहा टक्के जागा ओपन स्पेससाठी राखीव असताना ती जागा कोणी कोणाला विकली हा शोधाचा विषय असून यात कोट्यावधीचे व्यवहार झाल्याची दाट शक्यता असून महापालिका नगर रचनाकार या सर्व प्रकरणात सर्व संबंधितांवर शासनाची फसवणूक व स्थानिक प्लॉटधारक नागरीकांच्या ओपन स्पेस चोरीचा गुन्हा दाखल करेल काय अशी विचारणा आता होत आहे.

### ते विकासक आणि खरेदीदार कोण

जेव्हा एखादा विकासक किंवा जमीन मालक शेतजमिनीचे प्लॉट पाडतो , तेव्हा तिथे सार्वजनिक वापरासाठी 'ओपन स्पेस' म्हणून सोडणे आणि ती महापालिकेकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असते. परंतु, अकोल्यात एन.ए. आदेश झाले, प्लॉट विकून विकासक / बिल्डरांनी कोट्यवधी रुपये कमावले; पण जेव्हा महापालिकेने या जागांचा ताबा घेऊन तिथे विकास करणे गरजेचे होते, तेव्हा तिथे मोकळी जागाच शिल्लक राहिलेली नाही. काही ठिकाणी खुलेआम अतिक्रमण करून इमारती आणि पक्की बांधकामे उभारण्यात आली आहेत. महापालिका हद्दीतील १३० नकाशे गहाळ होण्यामागे महापालिकेतील कोणत्या बड्या अधिकाऱ्यांचा हात आहे ?. अशी विचारणा आता होत आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळयात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. अकोलेकरांच्या हक्काच्या जमिनी गिळंकृत करणाऱ्या या भूमाफियांची आणि त्यांना पाठिशी घालणारे कोण, या महाघोटाळयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे !

## गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची घोषणा, गृहकर्जदारांना दिलासा

प्रतिनिधी ५ जून



**मुंबई :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. यावेळी त्यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळे निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केलं. सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचे सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवत असल्याचे संजय मल्होत्रा यांनी जाहीर केले. आरबीआयने सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवत गृहकर्जदारांना दिलासा दिला आहे.

आरबीआयनं पतधोरण विषयक समितीच्या बैठकीत रेपो रेट स्थिर ठेवला आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी जागतिक पातळीवर भूराजनैतिक संघर्षामुळे निर्माण झालेली अस्थिरता, सप्लाय चेनमध्ये निर्माण झालेले अडथळे आणि दबाव याशिवाय ऊर्जा साधनांचे वाढलेले दर याचा परिणाम विकासाच्या वेगावर झाला असून महागाईच्या अंदाजात वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुरवठा तुटवड्याचा परिणाम चौथ्या तिमाहीत आणि त्यानंतर देखील कायम राहील. जागतिक संकटानंतर देखील देशातील रिटेल महागाई दर निश्चित टार्गेटच्या खाली असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे. संजय म्हलोत्रा यांनी म्हटलं की आर्थिक अनिश्चिततांच्या काळात आम्ही आव्हानं पार करुन पुढं जाऊ असा विश्वास आहे. पतधोरण विषयक समिती डेटावर लक्ष ठेवेल, आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा म्हणाले की पुरवठ्यावरील दबाव आणि इतर घडामोडींवर आमचं लक्ष असेल. सलग तिसऱ्या तिमाहीत न्यूट्रल धोरण स्वीकारत रेपो रेट जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं म्हलोत्रा यांच्याकडून सांगण्यात आलं.






# विदर्भात पावसाची प्रतीक्षा लांबली !

प्रतिनिधी ५ जून

**नागपूर :** प्रतीक्षा असलेल्या मान्सूनने गुरुवारी केरळात प्रवेश केला व दोन-तीन दिवसांत गोव्यापर्यंत पोहोचत १० जूनपर्यंत महाराष्ट्रात धडक देणार आहे. विदर्भात मात्र आनंदसरींसाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार असून, तोपर्यंत उकाड्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. गुरुवारी निरभ्र आकाशात उन्हाच्या चटक्यांनी नागपूरकरांना बेजार केले. यात रात्रीचा उकाडाही वाढला आहे.

हवामान विभागाने २४ तासांत म्हणजे ५ जून रोजी नागपूर जिल्ह्यात गडगडाटासह तुरळक पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ६ जूनला ढगाळ वातावरण राहील, तर ७ व ८ जून रोजी पुन्हा पावसाची शक्यता वर्तवली आहे. मात्र, ढगाळ वातावरण व पावसाच्या शक्यतेतही तापमान उसळण्याचा व ४३ अंशांच्या जाण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागपूरकरांना सध्यातरी उकाड्यापासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. उलट, दरवर्षीप्रमाणे जूनच्या वातावरणातील आर्दतायुक्त दमटपणामुळे उकाडा आणखी त्रासदायक होण्याची शक्यता आहे. दरम्यान, गुरुवारी ब्रह्मपुरी येथे देशात सर्वाधिक ४४.२ अंश तापमानाची नोंद झाली.






# केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या निधीचा चुराडा
# मजिप्रा, महापालिकेचे दूर्लक्ष

प्रतिनिधी ५ जून

**अकोला:** केंद्र शासनच्या अमृत २.० मध्ये शहरात सुरु असलेली भूमिगत गटार योजना ही भविष्यात अकोल्यासाठी अडचणीची ठरणार आहे. यातून ना पाणी जाईल ना मलबा त्याच बरोबर या योजनेत वस्ती नसलेल्या ठिकाणी सुरु असलेले गटार योजनेच्या कामांची चौकशी केल्यास केंद्र सरकारच्या योजनेच्या निधीचा झालेला गैरवापर अधोरेखित होत असून पुण्यातील कंपनीच्या मनमानी कारभार आणि मजिप्रा, महापालिका यांचे दूर्लक्ष यामुळे कोट्यावधीची भूमिगत गटार योजना अकोल्यात फसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

ज्या भागात लोकवस्ती नाही अशा राजेश्वर कॉलनी, साई कॉलनी, गोकर्णा कॉलनी जाजू नगर अन्नपुर्णा माता मंदिरामागे थेट गटर योजना राबविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या भागात लोकवस्ती नाही, नागरिक राहत नाही, मलजल निर्माण होत नाही अशा ठिकाणी कुठल्या आधारावर ही सरकारी योजना राबविली गेली याचा खुलासा पुणे स्थित कंपनी, मजिप्रा, महापालिका का करत नसल्याची ओरड आता होत आहे.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरकडे भूमिगत चे काम कसे

या योजनेत भविष्यात लोकवस्ती असलेल्या भागात देखील भुमिगत गटार योजनेचे काम सुरु असल्याचा दावा महापालिका अभियंता अमोल डोईफोडे यांनी केला आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअर असलेल्या अमोल डोईफोडे यांच्याकडे या योजनेचा चार्ज कसा काय असा प्रश्न विचारला जात आहे. महापालिकेत कार्यकारी अभियंता हे पद किती वर्षांपासून रिकामे आहे. प्रतिनियुक्तीवर महापालिकेत कार्यकारी अभियंता का येत नाही याची ही विचारणा आता सुरु झाली आहे.








सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. ५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल, पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे. जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवू या !

**जागतिक पर्यावरण दिन**

या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये 'पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य




होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत. 'जल, जमीन आणि जंगल' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो.

**प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय कार्यालय,
कोल्हापूर मो. ९७०२८५८७७७

---

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सी.जी. डी.एस.-अ.-21042026-271939
CG-DL-E-21042026-271939

ससाधारण EXTRAORDINARY
भाम ११ अण्ड उप-खण्ड (११)
PART 11 Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं 1890) नई दिल्ली, सोमवार, अप्रैल २०, २०२६/चैत्र ३०, १९४८
No. 1890) NEW DELHI, MONDAY, APRIL 20, 2026/CHAITRA 30, 1948

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
## अधिसूचना
## नई दिल्ली, २० अप्रैल, २०२६

का.बा. १९६१ (अ).- केन्द्रीय नरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनिगम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पच्चात् कि महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) तक के भूखंड का निर्माण (बार्शीटाकळी वायपास दो / चार लेन पेव्ड शोल्डर सहित का बताने, नादि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए यह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वीस प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तया उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर, को लिखित रूप ने किया जागसा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवत्तर देगा और ऐसी आजेगो की सुनवाई के पचात् तथा ऐसी और जांच करने के पश्झान, पदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे आदेश द्वारा या तो को अनुज्ञात कर सकेगा या अनुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (२) के अधीन सजम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेत अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने बाली भूमि के रेखांक और अन्य स्थर मम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका तिच्य पतियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए. के. कि.मी. ०/००से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) लिए बर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना महित भूमि का संक्षिप्त विवरण.

| राज्य का नाम : महाराष्ट्र | | | जिले का नाम : अकोला | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रपाल (हेक्टेयर) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| तालुक का नाम : बार्शीटाकळी | | | | | |
| गांव का नाम : अश्कारीपूर | | | | | |
| १ | ३७ Paiki | सरकारी | अकृषक | ०.०११५ (हेक्टेयर) | ०.०११५ |
| गांव का नाम : बार्शीटाकळी | | | | | |
| २ | 45/1/E | निजी | अकृषक | ०.०४ (हेक्टेयर) | ०.०४ |
| | | | | Total | 0.0515 |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**रोख अमीनखान, निदेशक**

### MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS
### NOTIFICATION
### New Delhi, the 20th April, 2026

S.O. 1961/E)- in exercise of powers confirred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of whith is given in the Schedule below is required for Building (Barshitaki Bypass Twu/ Four Lane with paved shoulder) maintenance, managemom and operation of National Highway No. 1614 in the stretch of land from Km 0/00 tu Km 3100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra, hereby declares itt intention to acquire such land Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Murtizapur, in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

Brief description of the land to be acquired, with or without structure falling National Highway No. 161A within the stretch of the land from Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra.

| State: MAHARASHTRA | | | District: AKOLA | | |
|---|---|---|---|---|---|
| SL No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluk: Barshitildi | | | | | |
| Village: Ashkaripur | | | | | |
| 1 | 37 Paili | Government | Non Agriculture | 0.0115 (Hectare | 0.0115 |
| Village : Barshitildi | | | | | |
| 2 | 45/1/E | Private | Non Agriculture | 0.04 (Hecture) | 0.04 |
| | | | | Total | 0.0515 |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**SHAIKH AMINKHAN,**
Directos

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/३०/२०२६

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. ५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू

## ■ जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख भारती खंडेलवाल यांची माहिती

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** भूमी अभिलेख उपसंचालक किंवा जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अधिकृत आदेशानंतर अकोला भूमी अभिलेख कार्यालयाचे तत्कालीन उप अधीक्षक भूमि अभिलेख पंकज पवार यांच्या विरोधात पोलिसांत एफआयआर (गुन्हा) दाखल करण्यात आला आहे. पुणे कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या विशेष तपासणीनंतर हे आदेश देण्यात आले होते, अशी माहिती भूमि अभिलेख विभागाच्या जिल्हा अधीक्षक भारती खंडेलवाल यांनी दिली. या प्रकरणात इतर काही कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याची पडताळणी करण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी देखील सुरू करण्यात आली आहे. असे ही त्यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना सांगितले.

उप अधीक्षक पंकज पवार याने केलेला गैरप्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय किंवा पाठिंब्याशिवाय शक्य आहे का?' असा प्रश्न




विचारला असता, जिल्हा अधीक्षक खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४९ आणि १५० अन्वये फेरफार प्रमाणित करण्याचे सर्व अधिकार पूर्णतः संबंधित कायद्यानुसार त्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीत असतात. या प्रक्रियेसाठी त्यांना कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीची किंवा स्वाक्षरीची कायदेशीर आवश्यकता नसते. त्यामुळे पवार यांनी घेतलेले निर्णय आणि त्यांच्या स्वाक्षरीने झालेले फेरफार हे त्यांच्याच कार्यकक्षेत झाले आहेत. त्यामुळे फेरफार प्रकरणात सर्वस्वी पंकज पवार हे सर्वस्वी जबाबदार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

मूळ लेआऊटचे नकाशे भूमी अभिलेख विभागाकडे नसतात, तर विभागाकडे केवळ 'मोजणीच्या शिटा' असतात. कार्यालयातील सर्व मोजणी शिटा पूर्णपणे सुरक्षित असून, विभागाकडील संपूर्ण अभिलेख स्कॅन आणि डिजिटाईज करण्यात आला आहे. त्यामुळे कोणतेही दस्तऐवज गायब झालेले नाहीत.'शासकीय लोकसेवकाचे मुख्य कर्तव्य हे शासकीय नियमांचे काटेकोर पालन करणे हेच असते,' असे सांगत खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, सध्या पुणे कार्यालयाच्या आदेशानुसार मुख्य संशयितावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या प्रकरणात इतर कोणी सहभागी आहे काय हा पोलिस तपासाचा भाग आहे. असे ही जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भारती खंडेलवाल म्हणाल्या.

# जुना कापड बाजारातील खड्डा अजूनही तसाच

## ♦ मागील वर्षी एक व्यक्ती वाहूनही प्रशासन ढिम्म



प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** महापालिका प्रशासनाचा अक्षम्य निष्काळजीपणा आणि दुर्लक्षामुळेच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्वात गजबजलेला टिळक रोड, विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी चौक, जुना कापड बाजारातील नाल्याचा खड्डा उघडा राहिल्याने ओसंडून वाहत होता. ज्यामध्ये एक व्यक्ती पडून दूरपर्यंत वाहून गेला आणि दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह सापडला होता. गेल्या वर्षीच्या घटनेतून प्रशासनाने धडा घेतलेला नाही. या बाबतीत आश्चर्य वाटत आहे.

त्या अपघातानंतर प्रशासन आणि नेतेमंडळी खडबडून जागे झाले. त्यांनी दुःखही व्यक्त केले. पण खेदाची गोष्ट म्हणजे हा जीवघेणा नाला आणि खड्डा आजही भयानक रूप धारण करून तशाच स्थितीत आहे. संबंधित अधिकारी आणि प्रशासन प्रमुखांचे दुर्लक्ष अजूनही कायम आहे आणि आता पुन्हा पावसाळा जवळ आला आहे. अपेक्षा एवढीच आहे की, पावसाळ्यापूर्वी केल्या जाणाऱ्या नालेसफाईच्या कामांसोबतच या जीवघेण्या खड्ड्याचा तात्काळ बंदोबस्त केला जावा; अन्यथा, पुन्हा एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे.

# खामगावात तरुणावर चाकूहल्ला ; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ५ जून


**खामगाव :** तालुक्यातील सारोळा येथील एका तरुणावर चाकूने हल्ला करून मारहाण केल्याची घटना ३ जून रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सारोळा येथील रहिवासी विकास हरिचंद्र जाधव हे ३ जून रोजी सायंकाळी सुमारे ७:३० वाजता दुचाकीने घरी जात होते. चिखली रोडवरील एका पेट्रोल पंपाजवळ असलेल्या विजय पान पॅलेससमोर त्यांना पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण (सर्व रा. सारोळा) यांनी अडविले. यावेळी चौघांनी विकास जाधव यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच किशोर रोहिदास चव्हाण याने चाकूने हल्ला करून त्यांच्या खांद्यावर व तळहातावर वार केल्याने ते जखमी झाले. या घटनेप्रकरणी विलास हरिचंद्र जाधव यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.फिर्यादीच्या तक्रारीवरून पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२ व १३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एएसआय भगवान काळबागे करीत आहेत.

# भीमनगर होजियरी मिल भागात रहिवाशांच्या आरोग्याशी खेळ

**पाणी वाहून जाण्यासाठी जागाच नाही मनपा प्रशासन लक्ष देईल का**

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** भीमनगर होजियरी मिल भागातील रहिवासी प्रचंड यातना सहन करीत आहेत. या भागात सांडपाणी वाहून नेण्यासाठी नाली नाही. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला डबके साचले आहे. विचित्र स्थिती या ठिकाणी पाहायला मिळते. नगर सेवकही लक्ष देत नाहीत. त्यामुळे निदान महापालिका प्रशासनाने तरी ही समस्या सोडवावी अशी मागणी आहे. कारण पावसाळ्यात तर नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो. साचलेले पाणी रस्त्यावर वाहते. ही समस्या सुटणे आवश्यक आहे सांडपाणी व्यवस्थापन नाही ही समस्या केवळ या भागात नाही तर विविध भागात हा प्रश्न आहे. भीमनगर होजियरी मिल भागात ही समस्या उग्र बनली आहे. अजय रामटेके नगर सेवक असताना साचलेले पाणी उपसण्यासाठी पुढाकार घेत होते. परंतु आता हा भाग दुर्लक्षित असल्याचा आरोप या परिसरातील नागरिक करीत आहेत. महापालिका आरोग्य विभागाने या भागाची पाहणी करून तातडीने प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.



# निवडणुकीत नियमांचे काटेकोर पालन व्हावे

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे पातूर येथे मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** पातूर नगरपरिषद तसेच आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण निवडणूक यंत्रणा सक्षम, सज्ज आणि सतर्क ठेवावी. प्रत्येक नियमाचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे, असे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणूक तयारी व आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा त्यांनी घेतला. यावेळी आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, न.




प. प्रशासन सहआयुक्त विश्वनाथ वडजे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पातूर व अकोट नगरपरिषद निवडणुकांच्या अनुषंगाने मतदान केंद्रांची तयारी, मनुष्यबळाचे नियोजन, तसेच आवश्यक साधनसामग्री यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी ग्रामपंचायत व इतर निवडणुकांसाठी आरक्षण सोडत, प्रशिक्षण प्रक्रिया आणि यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, आयुक्तांनी पातूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी केली. न. प. मराठी शाळा क्र. १ येथील मतदान केंद्राला त्यांनी दिली. पातूर येथे त्यांनी मतदान कर्मचाऱ्यांशी संवाद साधला व निवडणूक प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. निवडणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार घडता कामा नये. आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणुका शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडाव्यात, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्तांनी दिले.

# कांबळे यांच्या माघारीने खळबळ ; महाविकास आघाडीचे आंदोलन

प्रतिनिधी ५ जून




**यवतमाळ :** स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयाविरोधात महाविकास आघाडीने गुरुवारी शहरातील दत्त चौकात निदर्शने करत तीव्र निषेध व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोप केला की, उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेताना कांबळे यांनी आघाडीतील कोणत्याही घटक पक्षाला विश्वासात घेतले नाही. उलट विरोधी पक्षातील काही नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी माघार जाहीर केल्याने या निर्णयामागे राजकीय दबाव किंवा इतर कारणे असावीत, अशी शंका व्यक्त करण्यात आली. आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी महायुती सरकारवर निशाणा साधत लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला. आर्थिक प्रलोभने आणि दडपशाहीच्या माध्यमातून निवडणुकीवर प्रभाव टाकण्यात आल्याचा दावा करत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. दत्त चौकात झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, संपर्कप्रमुख किशोर इंगळे, संजय ठाकरे, जितेंद्र मोघे, राहुल ठाकरे, आरिज बेग, संजय वानखेडे, बबलू देशमुख, वैशाली सवई, कुणाल जानकर, शशांक केंढे, सय्यद रियाझ, कुशाल ठाकरे, रहमान शाह, जयराम मुनेश्वर, संजय महल्ले यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनाची माहिती काँग्रेस सोशल मीडिया समितीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून दिली.

# लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

## ♦ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



प्रतिनिधी ५ जून

**अमरावती :** मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक . प्रतापसिंह जाधव आणि संपादक . योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# महिलांच्या उद्योगवाढीसाठी बँकांनी पुढाकार घ्यावा - राजलक्ष्मी शाह

प्रतिनिधी ५ जून

**यवतमाळ :** वार्षिक क्रेडिट प्लॅन सेमिनारचे आयोजन ? गतवर्षी २,२२३ स्वयं सहाय्यता गटांना १०० कोटींचे कर्ज महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), यवतमाळ यांच्या वतीने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत वार्षिक क्रेडिट प्लॅन सेमिनार २०२६-२७ चे आयोजन महिला व बाल विकास भवन, जिल्हा परिषद, यवतमाळ येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक



ज्ञानेश्वर टापरे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अतुल इंगळे, विभागीय सल्लागार केशव पवार, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार पवन देशमुख तसेच माविमचे जिल्हा समन्वयक अधिकारी सुनील सोसे यांच्या हस्ते झाले. सेमिनारमध्ये राज्यस्तरीय नवतेजस्विनी प्रकल्पाचे सादरीकरण केशव पवार यांनी केले, तर आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचा जिल्हास्तरीय क्रेडिट प्लॅन सुनील सोसे यांनी सादर केला. यवतमाळ जिल्ह्यात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २,२२३ स्वयं-सहाय्यता गटांना १००.४७ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

# बुलडाणा, अमरावतीसह पाच आधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता

## ♦ चार कोटींच्या प्रकल्पांसाठी ५० टक्के शासकीय अनुदान

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** आधुनिक संत्री प्रक्रिया केंद्र उभारणे, या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत बुलडाणा, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांतील पाच विविध ठिकाणच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांच्या प्रस्तावांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने अखेर राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली. यामुळे विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, या मंजुरीमुळे विदर्भातील संत्री उत्पादक पट्ट्यात अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांचे जाळे निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार, प्रत्येकी ४ कोटी रुपये खर्चाच्या खालील पाच संस्थांच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये कृष्णार्पण फार्मर प्रोड्युसर



कंपनी लिमिटेड, मोर्शी (जि. अमरावती), कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर, बुलढाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, संग्रामपूर (जि. बुलढाणा), कृषी उत्पन्न बाजार समिती, काटोल (जि. नागपूर) आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर (जि. नागपूर) यांचा समावेश आहे. मंजूर झालेल्या सर्व प्रकल्पांची किंमत प्रत्येकी ४ कोटी रुपये आहे. लाभार्थी संस्थेला पहिल्यांदा स्वतःचा किमान १५ टक्के स्वनिधी खर्च करावा लागेल. उर्वरित ८५ टक्के रक्कम बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारणे आवश्यक राहील. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देईल. हा दाखला सादर केल्यानंतर शासनाकडून प्रकल्प किमतीच्या कमाल ५० टक्के मर्यादित (जास्तीत जास्त २ कोटी रुपये) अनुदान पणन मंडळामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. निविदा प्रक्रियेत जर शासनाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीची निविदा मंजूर झाली, तर त्या मंजूर निविदा रकमेच्या ५० टक्केच अनुदान अनुज्ञेय राहील. प्रक्रिया केंद्रासाठी लाभार्थ्याकडे स्वतःची किंवा किमान ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीची भाडेतत्त्वावरील जागा असणे बंधनकारक आहे, जी शासनाकडे गहाण राहील.

### पुणे कृषी पणन मंडळ नोडल एजन्सी

♦ या संपूर्ण योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यामुळे आता लाभार्थी संस्थांना त्वरित निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती करावी लागणार आहे. चालू आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२६-२०२७मध्येच या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे कडक आदेश शासनाने दिले आहेत. तसेच, प्रकल्पाचा दैनंदिन खर्च, वीज-पाणी देयके, देखभाल व मनुष्यबळाचा खर्च संबंधित संस्थांनाच करावा लागणार असून, त्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी मिळणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



# सोन्या–चांदीच्या दरात मोठी घसरण ; चांदी 6,000 रुपयांनी स्वस्त

प्रतिनिधी ५ जून

**मुंबई :** सराफा बाजारात शुक्रवारी(दि.५) सोने आणि चांदीच्या दरांमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली. इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या ताज्या आकडेवारीनुसार, गुरुवारी संध्याकाळच्या तुलनेत शुक्रवारी दुपारपर्यंत सोन्याचा दर प्रति १० ग्रॅममागे १,८९६ रुपयांनी, तर चांदीचा दर प्रति किलोमागे ६,१३८ रुपयांनी घसरला आहे.

जागतिक बाजारातील अस्थिरता आणि देशांतर्गत मागणीतील बदल यामुळे मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये मोठे चढ-उतार सुरू असल्याचे दिसून येत आहे. आयबीजेएच्या माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याचा दर शुक्रवारी १,५४,१९० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवला गेला. गुरुवारी संध्याकाळी हा दर १,५६,०८६ रुपये प्रति १० ग्रॅम होता. म्हणजेच अवघ्या काही तासांत सोन्याच्या दरात १,८९६ रुपयांची घसरण झाली आहे.

२२ कॅरेट ते १४ कॅरेट सोन्याचे दर(शुक्रवार) २३ कॅरेट सोने : १,५३,५७३ रुपये प्रति १० ग्रॅम २२ कॅरेट सोने : १,४१,२३८ रुपये प्रति १० ग्रॅम १८ कॅरेट सोने : १,१५,६४३ रुपये प्रति १० ग्रॅम १४ कॅरेट सोने : ९०,२०१ रुपये प्रति १० ग्रॅम

**चांदीतही मोठी घसरण :** गुरुवारी संध्याकाळी १ किलो चांदीचा दर २,६१,०८८ रुपये होता. तो शुक्रवारी घसरून २,५४,९५० रुपये प्रति किलो झाला. याचा अर्थ २४ तासांपेक्षा कमी कालावधीत चांदी ६,१३८ रुपयांनी स्वस्त झाली आहे. विशेष म्हणजे, मागील पाच व्यापार सत्रांनंतर प्रथमच चांदीचा दर २.६० लाख रुपयांच्या खाली आला आहे.

**जीएसटी आणि मेकिंग चार्ज वेगळे :** सराफा बाजारातील जाहीर करण्यात आलेल्या दरांमध्ये ३ टक्के जीएसटी आणि दागिन्यांचे मेकिंग चार्ज समाविष्ट नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष खरेदीवेळी ग्राहकांना यापेक्षा अधिक किंमत मोजावी लागू शकते. **पंतप्रधान मोदींचे सोने खरेदीबाबत आवाहन :** दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच नागरिकांना एक वर्षासाठी सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याची चर्चा बाजारात सुरू आहे. यामागे भारताचे वाढते आयात बिल हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या आयातीमुळे देशावरील आर्थिक ताण वाढला आहे. त्यातच सोन्याची मोठ्या प्रमाणात आयात झाल्यास परकीय चलन साठ्यावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवले असल्याचे सांगितले जात आहे.



## पर्यावरण दिनानिमित्त भाजयुमोतर्फे ‘पेडल फॉर प्लॅनेट ग्रँड सायक्लोथॉन’चे आयोजन




**मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत मुंबई भाजप युवा मोर्चातर्फे शुक्रवारी बोरिवली पूर्व येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ’पेडल फॉर प्लॅनेट ग्रँड सायक्लोथॉन’ आयोजित करण्यात आले होते. यात मुंबई भाजपचे अध्यक्ष आ. अमीत साटम यांच्यासह २ हजारांहून अधिक सायकलपटूंनी सहभाग घेतला.

यासोबतच मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए)चे अध्यक्ष अजिंक्य नाईक, आ. संजय उपाध्याय, भाजप सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, श्वेता परुळेकर, मुंबई महानगरपालिका सभागृह नेते गणेश खणकर, नगरसेवक तेजिंदर सिंग तिवाना, भाजयुमोचे अध्यक्ष दीपक सिंह यांच्यासह भाजयुमोचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. शहराच्या विविध भागांतील युवक, नागरिक आणि सायकलप्रेमींनी या सायक्लोथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना आ. अमीत साटम म्हणाले की, ’’पेडल फॉर प्लॅनेट’ हा केवळ सायक्लोथॉन नव्हता, तर पर्यावरण संरक्षण, निरोगी जीवनशैली आणि शाश्वत विकासासाठी मुंबईतील तरुणांनी घेतलेली सामूहिक प्रतिज्ञा होती. हजारो सायकलपटूंच्या उत्स्फूर्त सहभागातून पर्यावरणीय जबाबदारीबाबत वाढती जनजागृती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची गरज अधोरेखित झाली.

मुंबई पारंपरिकदृष्ट्या सायकलिंग शहर नसले तरी लहान अंतरासाठी सायकलचा वापर वाढवल्यास आरोग्य आणि पर्यावरण या दोन्हींचा लाभ होईल. भविष्यात समुद्राची वाढती पातळी यांसारख्या आव्हानांचा विचार करता सायकलिंग संस्कृतीला प्रोत्साहन देणे हे पर्यावरण संरक्षणासाठी दूरदृष्टीचे पाऊल आहे.’

**निरोगी मुंबई घडविण्याचा सामूहिक संकल्प - दीपक सिंह**

भाजयुमो मुंबई अध्यक्ष दीपक सिंह म्हणाले की, ’जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित ’पेडल फॉर प्लॅनेट’ हा केवळ सायक्लोथॉन नसून स्वच्छ, हरित आणि निरोगी मुंबई घडविण्याचा एक सामूहिक संकल्प आहे. वाढते प्रदूषण, घटणारे हरित क्षेत्र आणि हवामान बदल यांसारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी समाजाने, विशेषतः युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. ’पेडल फॉर प्लॅनेट’ हा केवळ कार्यक्रम नसून एक लोकचळवळ आहे. विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राची सर्वात मोठी ताकद ही युवा शक्ती आहे. युवक जागृत झाला तर देश प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जातो

## महाराष्ट्रात पुन्हा ‘रिडल्स’ आंदोलनासारखा भडका उडणार?



**मुंबई :** राज्य सरकारने आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या नावाखाली अनुसूचित जाती घटकांतील काही जातींत वैर निर्माण करण्याचे उद्योग सुरू केले आहेत. यापूर्वी मराठा-ओबीसी घटकांबाबत असाच उद्योग करण्यात आला.

सरकारने हे उद्योग तत्काळ थांबवावेत; अन्यथा येत्या काळात राज्यात रिडल्स आंदोलनासारखी परिस्थिती निर्माण होईल, असा इशारा चर्मकार समाजाचे नेते व माजी आमदार बाबूराव माने यांनी मुंबईत दिला. उपवर्गीकरणाचा प्रस्ताव मागे न घेतल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला. मुंबई प्रेस क्लबमध्ये प्रस्तावित अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात ’आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती’च्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. यात बाबूराव माने, राहुल डंबाळे, डॉ. बाबा कांबळे, दिव्या ढोले तसेच आंबेडकरी व चर्मकार समाजाच्या चळवळीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी माने यांनी प्रस्तावित उपवर्गीकरणाला तीव्र विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींसाठी निर्माण केलेल्या आरक्षणाच्या घटनात्मक चौकटीतच समाजाची प्रगती साधली पाहिजे. समाजातील एकजूट अबाधित ठेवणे हेच सर्वांचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे ते म्हणाले.

**...तर जनआंदोलन उभारू!**

पावसाळी अधिवेशनापूर्वी सरकारला जनतेच्या भावना समजून घ्याव्या लागतील; अन्यथा व्यापक जनआंदोलन उभे राहील, असा इशारा त्यांनी दिला.

**अहवाल रद्द करण्यासाठी मोर्चा**

अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात भीम आर्मीने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मंत्रालयापर्यंत गुरुवारी भव्य मोर्चा काढला. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल तत्काळ रद्द करावा आणि उपवर्गीकरण प्रक्रियेस स्थगिती द्यावी, अशी मागणी या मोर्चाद्वारे करण्यात आली. अहवाल तयार करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. ?मोर्चानंतर भीम आर्मीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सुपूर्द केले.

## दहा वर्षांत दीड लाख झाडांवर कुऱ्हाड, विविध प्रकल्पांसाठी बळी



**मुंबई :** पर्यावरण दिनानिमित्त जगभर पर्यावरण संवर्धनाबाबत चर्चा केली जात असताना देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची ’फुप्फुसे’ विकासाच्या नावाखाली निकामी केली जात आहेत. १० वर्षांत मुंबईत मेट्रो, कोस्टल रोड, गृहनिर्माण पुनर्विकाससारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी तब्बल दीड लाखांहून अधिक झाडे कापण्यात आली, तर मुंबईच्या किनारपट्टीचे रक्षण करणाऱ्या हजारो कांदळवनांचाही बळी देण्यात आला. काही झाडांचे पुनर्रोपण केल्याचा दावा पालिकेने केला आहे.

मुंबई कोस्टल रोड (वर्सोवा ते भाईंदर टप्पा), मेट्रो-३ कारशेड, उड्डाणपूल आणि रस्ते रुंदीकरण यांसारख्या प्रकल्पांमुळे मुंबईचे हक्काचे हरित क्षेत्र वेगाने घटले आहे. नुकतेच मे महिन्यात पालिकेने कोस्टल रोडच्या पुढील कामांसाठी जवळपास दोन हजार झाडे कापण्यास मंजुरी दिली आहे, तर जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी गोरेगाव, मालाड व अंधेरी परिसरातील २५ हजारांहून अधिक झाडांवर कुऱ्हाड चालवण्यात आली. तोडलेल्या एका झाडाच्या बदल्यात नवीन झाडे लावणे किंवा त्याचे पुनर्रोपण करणे बंधनकारक आहे; मात्र मुंबईत पुनर्रोपण केलेल्या झाडांचा जिवंत राहण्याचा दर २५ टक्क्यांपेक्षाही कमी आहे, असे पर्यावरण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मुंबईची भरपाई चंद्रपुरात धक्कादायक बाब म्हणजे, मुंबईतील कोस्टल रोड किंवा अन्य प्रकल्पांसाठी कापल्या जाणाऱ्या झाडांची भरपाई म्हणून नवी झाडे चक्क रायगड, पनवेल किंवा चंद्रपूरसारख्या भागात लावली जात आहेत. मुंबईतील झाडे नष्ट करून विदर्भात झाडे लावण्याच्या या अजब कारभारामुळे मुंबईचे पर्यावरण कायमचे धोक्यात आले आहे.

**केवळ दिखाऊ वृक्षारोपण नको!**

१० वर्षांत झालेल्या वृक्षतोडीचा फटका मुंबईकरांना बसत आहे. सिमेंटच्या जंगलामुळे मुंबईत ’अर्बन हीट आयलंड’चा प्रभाव वाढला आहे. पर्यावरण दिनानिमित्त केवळ दिखाऊ वृक्षारोपण न करता मूळ पर्यावरण वाचवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. वृक्ष प्राधिकरणाने दररोज सरासरी ४० झाडे कापण्याची परवानगी दिली. त्यामुळे दहा वर्षांत दीड लाखांवर झाडे तोडण्यात आली. हेच आज मुंबईतील वाढणाऱ्या उष्णतेचे मुख्य कारण आहे.

## मोठा पगार मिळूनही जीवनात आनंद नाही

**मुंबई :** महिन्याला २.५ लाख कमावतोय, पण इतके गरीब कधीच वाटले नाही. २५ हजार रुपये कमावणारा मी जास्त आनंदी होतो,’ या शीर्षकाखाली शेअर करण्यात आलेल्या पोस्टने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. मोठा पगार मिळूनही जीवनातील आनंद हरवल्याची भावना अनेकांना स्वतःच्या अनुभवाशी जोडून घेता आली. महिन्याला २.५ लाख पगार कमावतो तरीही ‘गरीब’ असल्यासारखे वाटते; कर्मचाऱ्याची पोस्ट व्हायरल ’महिन्याला २.५ लाख कमावतोय, पण इतके गरीब कधीच वाटले नाही. २५ हजार रुपये कमावणारा मी जास्त आनंदी होतो,’ या शीर्षकाखाली शेअर करण्यात आलेल्या पोस्टने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. मोठा पगार मिळूनही जीवनातील आनंद हरवल्याची भावना अनेकांना स्वतःच्या अनुभवाशी जोडून घेता आली. महिन्याला २.५ लाख पगार कमावतो तरीही ‘गरीब’ असल्यासारखे वाटते; कर्मचाऱ्याची व्हायरल ’महिन्याला २.५ लाख कमावतोय, पण इतके गरीब कधीच वाटले नाही. २५ हजार रुपये कमावणारा मी जास्त आनंदी होतो,’ या शीर्षकाखाली शेअर करण्यात आलेल्या पोस्टने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. मोठा पगार मिळूनही जीवनातील आनंद हरवल्याची भावना अनेकांना स्वतःच्या अनुभवाशी जोडून घेता आली. २.५ लाख पगार कमावतो तरीही ‘गरीब’ असल्यासारखे वाटते; कर्मचाऱ्याची पोस्ट व्हायरल ’महिन्याला २.५ लाख कमावतोय, पण इतके गरीब कधीच वाटले नाही.

## पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांवर जाहीरपणे बोलणे वैशाली मानेंना नडलं !



**मुंबई :** पोलिस खात्यातील बदल्यांबाबत गंभीर आरोप करणारे पोलिस अधिकारी वैशाली माने (ॅर्प्ग् ्रैहा) यांना नडलं आहे. त्यांची वीस दिवसांपूर्वी गुन्हे अन्वेषण विभागाच्या (पुणे) पोलिस अधीक्षकपदावरून मिरा भाईंदरला बदली करण्यात आली होती. आता त्यांची बदली गृहविभागाने रद्द केली आहे. त्यांना नव्या ठिकाणी नियुक्ती देण्यात आलेली नाही.

पोलिस खात्यातील बदल्यांबाबत अनेकदा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चा होत असते. अनेकदा अधिकारी राजकीय लॉबिंगचा वापर करून पोस्टिंग मिळवत असतात. नुकताच पोलिस अधिकाऱ्यांच्या काही बदल्या झाल्या होत्या. त्यात गुन्हे अन्वेषण विभागच्या यांची मिरा भाईंदर येथे बदली झाली होती. या बदलीनंतर एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीमध्ये वैशाली माने यांनी पोलिस खात्यातील बदल्यांबाबत गंभीर आरोप केले होते.

अनेक पुरुष अधिकारी पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे याच परिसरात वर्षानुवर्षे फिरत राहतात-माने राज्य पोलीस दलातील बदल्यांच्या राजकारणावर आणि महिला अधिकाऱ्यांवरील कथित अन्यायावर वैशाली माने यांनी आक्रमक भूमिका घेतली. नुकताच अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. या बदल्यांमध्ये महिला अधिकाऱ्यांना न्याय मिळाला नसल्याचा थेट आरोप वैशाली माने यांनी केलाय. महिला अधिकाऱ्यांना साईड पोस्टिंग दिली जाते किंवा इतक्या दूरच्या ठिकाणी पाठवले जाते की तिथे प्रत्यक्ष जाऊन काम करणे कठीण होते. दुसरीकडे अनेक पुरुष अधिकारी पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे याच परिसरात वर्षानुवर्षे फिरत राहतात, असा त्यांचा आरोप होता. त्यांच्या आरोपाची दखल मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत या संदर्भात पोलिस महासंचालक लक्ष घालतील, असे सांगितले होते. त्यानंतर नव्या बदल्यांच्या आदेशामध्ये वैशाली माने यांची बदली रद्द करण्यात आली आहे. स्वस्तात सोन्याची लालच पडली महागात, रायगडच्या जि. प. सदस्यासह तिघांना अहिल्यानगरमध्ये ५० लाखांना लुटले सात अधिकाऱ्यांच्या बदल्या, बारी पुणे सीआयडीला मुंबईतील पोलिस उपआयुक्त दिनेश गिरीधर बारी यांची पुणे सीआआयडीला पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रवासाचं वेळापत्रक कोलमडणार! रेल्वेवर १३ तासांचा विशेष ब्लॉक



**मुंबई :** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात आटगाव स्थानकावर नवीन इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच जुने सिग्नल पॅनेल हटविण्यासाठी शनिवार (ता. ६) दुपारी २ वाजल्यापासून रविवारी (ता. ७) पहाटे ३ वाजेपर्यंत १३ तासांचा विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकचा सर्वाधिक फटका कसारा मार्गावरील उपनगरीय सेवांना बसणार असून ३४ मेल-एक्स्प्रेस गाड्यांच्या वेळापत्रकातही मोठे बदल करण्यात आले आहेत.

ब्लॉक कालावधीत आसनगाव ते कसारादरम्यान लोकल सेवा पूर्णपणे बंद राहणार आहे. त्यामुळे सीएसएमटीहून सकाळी ११.४२ ते रात्री ८.४४ दरम्यान सुटणाऱ्या सर्व कसारा लोकल गाड्या आसनगाव येथेच अर्ध्यावर थांबतील. काही गाड्या खडवली, टिटवाळा आणि कल्याणपर्यंतच चालविण्यात येणार आहेत. तसेच कसाऱ्याहून सीएसएमटीकडे येणाऱ्या लोकल गाड्याही आसनगाव येथूनच सुरू होणार आहेत. ब्लॉकपूर्वी सीएसएमटीहून व कसाऱ्यासाठी शेवटची लोकल व सकाळी १०.१६ वाजता सुटेल. तर ७ कसाऱ्याहून सीएसएमटीकडे शेवटची लोकल दुपारी १२.१९ वाजता धावेल. ब्लॉकनंतर पहिली लोकल रविवारी पहाटे ४.१९ वाजता सीएसएमटीहून कसाऱ्यासाठी, तर पहाटे ३.५१ वाजता कसाऱ्याहून सीएसएमटीकडे सुरू होईल.

**एक्स्प्रेस गाड्या रद्द :** या विशेष ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या गाड्यांवरही मोठा परिणाम होणार आहे. सीएसएमटी-धुळे एक्स्प्रेस, धुळे-सीएसएमटी एक्स्प्रेस तसेच पंचवटी एक्स्प्रेसच्या दोन्ही फेऱ्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत. हजूर साहिब नांदेड-सीएसएमटी एक्स्प्रेस मनमाड येथेच अर्ध्यावर थांबविण्यात येणार असून, हिंगोली डेक्कन जनशताब्दी नाशिक रोडपर्यंतच चालविण्यात येईल.

**मार्ग बदलून धावणार :** याशिवाय हावडा मेल, अमृतसर एक्स्प्रेस, महानगरी एक्स्प्रेस, गोरखपूर विशेष, पाटलीपुत्र एक्स्प्रेस, कुशीनगर एक्स्प्रेस आदी गाड्या एक ते चार तास विलंबाने सोडण्यात येणार आहेत. तर कामायनी एक्स्प्रेस, गोरखपूर एक्स्प्रेस, देवगिरी एक्स्प्रेस, नंदीग्राम एक्स्प्रेस आणि साईनगर शिर्डी एक्स्प्रेससह काही गाड्या कल्याण-कर्जत-पुणे-मनमाड या पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्या आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135